# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव

**(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)**

दूरध्वनी क्र.०२५७/**२२८१५२२** फॅक्स क्र.०२५७/**२२८१३१९**

Website : www.gcoej.ac.in E-mail - princoej@rediffmail.com

जा.क्र. शाअमज /लेखा/२०१८ / 296 दि. 01/02/2018

**कालमर्यादा: दि. १५.०२.२०१८**

## आयकर परिपत्रक

विषय - आर्थिक वर्ष २०१७-१८ चे आयकर गणने बाबत.

सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सुचित करण्यात येते की, आर्थिक वर्ष २०१७-१८ चे Annexure II च्या नमुन्याची प्रत महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर **Download Section** मध्ये अपलोड करण्यात आलेली आहे. यास्तव सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी संकेतस्थळावरुन प्रत डाऊनलोड करून आयकराबाबतची परीगणना करतेवेळी वेळोवेळी मिळालेले मानधन/उत्पन्न समाविष्ट करावे. सर्व प्रकारचे मानधन आयकरासाठी दाखविणे हे बंधनकारक आहे. तसेच जे अधिकरी व कर्मचारी हे संस्थेत बदलुन किंवा नव्याने हजर झालेले असतील त्यांनी त्यांचे पुर्विच्या संस्थेतील वेतनाबातचे सविस्तर उत्पन्न हे स्वतंत्रपणे आडव्या तक्त्यात बेरजेसह नमुद करावे तदनंतर त्याच विवरणपत्रात खाली या महाविद्यालयातील मिळालेले एकूण उत्पन्न स्वतंत्र दर्शवून सर्वात शेवटी एकत्रीत बेरीज करून ती Annexure II मध्ये एकूण उत्पन्न म्हणून दर्शविण्यात यावी व या रक्कमेत मागील वेतन व भत्या बाबत मिळालेल्या अधिकच्या रक्कमा न दर्शविता त्या स्वतंत्र Other Income मध्ये दर्शविण्यात यावे.

Annexure II मधील अ.क्र.८ मधील A To C हया बाबतच्या रू.१५००००/- इतक्या वजावटीची कागदपत्रे एकत्रीत करून स्वतंत्रपणे जोडावी. तदनंतर अ.क्र. ९ मधील प्रत्येक वजावटीबाबतची देखिल कागदपत्रे / गुंतवणुक नेमकी कोणाच्या नावे केलेली आहे हे स्पष्ट होण्याकरीता जोडणे आवश्यक आहे. त्या शिवाय हया बाबतची वजावट ग्राहय धरता येणार नाही. व कार्यालयाकडून या सवलतीचा लाभ न देता आयकर कपात केली जाईल याची नोंद घ्यावी. **तसेच ज्यांना फेब्रुवारी व मार्च २०१८ या महिन्यामध्ये Regular Subscription (उदा. LIC, PLI etc.) भरावयाचे आहे, त्यांनी हमीपत्र भरून द्यावे , त्याशिवाय आयकर तक्त्यामध्ये गणना केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.** तसेच **अ.क्र. ९** मधील 80G अंतर्गत Donation paid through employer या बाबतची गुतंवणुक Annexure II मध्ये न दर्शविता रिर्टन भरतेवेळी क्लेम करण्यात यावा. **तसेच माहे फेब्रुवारी २०१८ च्या वेतनातुन सर्व नियमित अधिकारी/कर्मचा-यांच्या वेतनातुन रू. ३४५/- प्रत्येकी समुह अपघात विमा योजनेची कपात करण्यात येणार आहे तेव्हा आयकर कपातीची गणना करतेवेळी सदर रक्कम विचारात घेण्यात यावी.**

सर्व अधिकारी/कर्मचा-यांनी आपापले २०१७-१८ चे वेतनाचे उत्पन्न दर्शविणारा तक्ता व Annexure II कार्यालयास दिनांक १५/०२/२०१८ पर्यंत वर्ग **१ चे प्रबंधक, व वर्ग ३ चे कार्यलय अधिक्षक यांच्याकडून संपुर्ण कागदपत्रासह तपासुन** घेवुनच नंतर दिनांक १५/०२/२०१८ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह दोन प्रतीत सादर करावे.

विहीत मुदतीत आयकरा बाबतचे विवरणपत्र सादर न करणा-या अधिकारी/कर्मचा-यांचे माहे फेब्रुवारी २०१८ चे नियमित वेतन देयकात वेतन काढले जाणार नाही व त्यांच्या वेतनाच्या विलंबास ते स्वत:जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

( डॉ.आर.पी.बोरकर )
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव

प्रत -१. सर्व विभाग प्रमुख माहिती व कार्यवाहीसाठी.
२ / त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरचे परीपत्रक आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांच्या निर्देशनास आणुन द्यावे .तसेच आपल्या विभागातर्फे वाटप करण्यात आलेल्या मानधन वाटपाच्या यादया त्वरित रोखपाल विभागात सादर कराव्या.
२. रोखपाल माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
२/ त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी महाविद्यालयाती०ल सर्व अधिकरी/कर्मचारी यांना २०१७ – २०१८ मध्ये देण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या मानधनाबाबतची सविस्तर शिर्षानिहाय माहिती तयार करून आयकराबाबतचे विवरणपत्र तपासणी कामी प्रबंधक / कार्यालय अधिक्षक यांना दिनांक १०/०२/२०१८ पर्यंत सादर करावी.
३. प्रबंधक व कार्यालय अधिक्षक यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
४. श्री. आर. एल. वाणी, प्र.सहाय्यक यांनी संबंधितांच्या आयकर विवरणपत्र तपासणीकामी मदत करावी